नैतिक अध:पतनाच्या अपराधाबद्दल सिध्दापराध ठरविण्यात आलेल्या महानगरपालिकेच्या सदस्याला संबंधित अधिनियमांतील तरतुदीनुसार अनर्ह ठरविण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाकडे पत्रव्यवहार न करण्याबाबत.

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**

क्रमांक-रानिआ/मनपा-२०१४/प्र.क्र.२/का.५,
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १३/०१/२०१५

**वाचा :- राज्य निवडणूक आयोगाचे क्रमांक-रानिआ/मनपा २०१४/प्र.क्र.२/का.५, दि.२७/०१/२०१४**

**परिपत्रक**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या एका सदस्याला नैतिक अध:पतनाच्या अपराधाबद्दल सक्षम न्यायालयाने सिध्दपराध ठरविले असल्याने त्या सदस्याला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम १० मधील तरतुदीअन्वये अनर्ह ठरविण्याबाबत योग्य ते आदेश व्हावेत अशी उल्हासनगर महानगरपालिकेने राज्य निवडणूक आयोगास विनंती केली होती. या विनंतीच्या अनुषंगाने, त्या वैयक्तिक प्रकरणात, आयोगाच्या उपरोक्त दि.२७/१/२०१४ च्या पत्रान्वये उल्हासनगर महानगरपालिकेस आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले असून या पत्राच्या प्रती सर्व महानगरपालिका आयुक्त यांना अग्रेषित करण्यात आलेल्या आहेत. मात्र त्यानंतरही काही महानगरपालिकांकडून अशा प्रकरणी आयोगाकडे संदर्भ करण्यात येत असून वेगवेगळया मुद्दयांवर मार्गदर्शन मागविण्यात येत आहे. वस्तुत: नैतिक अध:पतनाच्या अंतर्भूत असलेल्या कोणत्याही अपराधाबद्दल भारतातील न्यायालयाने पालिका सदस्यास सिध्दापराध ठरविलेले असेल तर असा सदस्य पालिका सदस्य म्हणून राहण्यास अनर्ह ठरतो. यासंदर्भातील संबंधित तरतुदी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम,१९४९ च्या कलम १०, ११ व १२ मध्ये तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १६, १७ व १८ मधील तरतुदी स्पष्ट आहेत. त्यानुसार अशा प्रकरणात संबंधित महानगरपालिकांनी योग्य ती कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्यासाठी राज्य निवडणूक आयोगाकडून मार्गदर्शन मागविण्यासाठी कोणतेही कारण नाही.

२. वरील परिस्थितीत राज्य निवडणूक आयोगाच्या उपरोक्त दिनांक २७/१/२०१४ च्या पत्रान्वये देण्यात आलेल्या सूचना अधिक्रमित करण्यात येत आहेत. त्यामुळे अशा प्रकरणात यापुढे राज्य निवडणूक आयोगाकडे मार्गदर्शन मागविण्यासाठी पत्रव्यवहार करण्यात येऊ नये.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(नि. ज. वागळे)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :-

१. सर्व महानगरपालिका आयुक्त
२. निवड नस्ती.